# भूजल स्मरणिका
# २०१८




## ४८ वा वर्धापन दिन

**आजची बचत हाच उद्याचा आधार!**
**भूजल संवर्धनाचा आता करूया निर्धार!**

# भूजल स्मरणिका

# २०१८

## ४८ वा वर्धापन दिन

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
महाराष्ट्र शासन

१६ जुलै २०१८

# अनुक्रमणिका


- मा. संचालक यांचे मनोगत...
- भूजल यंत्रणेबाबत थोडक्यात...
- भूजल यंत्रणेचे कार्य आणि वाटचाल
- महाराष्ट्र राज्य संचालक
- यंत्रणेची बलस्थाने
- वर्ष २०१७-१८ मध्ये झालेली वैशिष्ट्यपूर्ण कामे
- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत झालेले कामकाज
    - भूजल सर्वेक्षणच्या कामाची माहिती प्रसारण माध्यमांचे मदतीने प्रसिद्धी
    - प्रदर्शन कक्ष विस्तारीकरण
    - ज्ञानकेंद्र
    - प्रजासत्ताक दिन व चित्ररथ
    - वृक्षारोपण
    - जनतेशी संपर्क
    - ४८ वा वर्धापन दिन

# मा.संचालक यांचे मनोगत...

यंत्रणेच्या ४८व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून “भूजल स्मरणिका -२०१८” हे पुस्तक प्रकाशित करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. सदर पुस्तिकेमध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या कामकाजाची थोडक्यात माहिती, यंत्रणेची कार्ये, बलस्थाने, आतापर्यंत लाभलेल्या संचालकांची माहिती त्यांच्या कार्यकाल व छायाचित्रासह देणेचा प्रयत्न करणेत आला आहे.

भू.स.वि.यं. गेली ४८ वर्षे कार्यरत असून यंत्रणेकडे उच्च शिक्षित व तंत्रज्ञानाचे वापरात निपुण असा भूवैज्ञानिक, भूभौतिक व अभियांत्रिकी वर्ग आहे. मात्र यंत्रणेचे नक्की काय काम आहे याबाबत जनमानसात जास्त प्रसिद्धी झालेली नाही. अगदी अलिकडच्या काळात पाणी गुणवत्तेच्या प्रयोगशाळा यंत्रणेकडे आल्यानंतर यंत्रणेचे महत्व लोकांमध्ये वाढले आहे. अशावेळी यंत्रणेतील कर्मचा-यात उत्साह असणे व ते चांगले काम करत असलेची भावना प्रकर्षाने जाणवणे अत्यंत आवश्यक आहे. या यंत्रणेमध्ये रूजू झालो तेव्हा पासून या कार्यालयास लाभलेला विस्तृत परीसर, आधुनिक यंत्रसामुग्री - तंत्रज्ञान, स्वयंसिद्ध अधिकारी -कर्मचारी वर्ग, भूजलासारखा महत्वाचा, गहन व पर्यावरणाशी निगडीत विषय या सर्वांमुळे येथे काहीतरी अभिनव प्रयोग सूरू करावे हे माझे मनात होते.

यापूर्वी देखील मी ‘घरपोहोच धान्य योजना’, ‘जनता दरबार’, ‘वंचितांसाठी तात्पुरते रेशन कार्ड’, ‘शेतक-यांसाठी ग्रंथालय’, ‘सात-बारा ग्रंथालय’ इत्यादी अनेक अभिनव उपक्रम माझ्या कारकिर्दीमध्ये जनोपयोगासाठी केले. त्यात त्यावेळीच्या प्रत्येक कार्यालयाचे मला सहकार्य लाभले. अधिकारी असो वा कर्मचारी, त्यांच्या कलागुणांना, त्यांच्याकडील कौशल्य गुणांना उद्युक्त केले की अगदी पहाडाएवढी कामे देखील ते उत्साहाने करतात. परिणामी त्यांना देखील त्यांची होणारी वैयक्तिक प्रगती जाणवल्याने आत्मिक समाधान लाभते. त्यामुळे कार्यालयातील वातावरणदेखील आनंदी राहते व पर्यायाने कामकाजाची गती वाढते.

या सर्व कारणांमुळे ज्ञानकेंद्र या उपक्रमाबाबत तातडीने निर्णय देऊन हा उपक्रम सूरू केला. मात्र यावेळी मी ही खबरदारी घेतली की, यात वैयक्तिक छंद, कर्तृत्वाबरोबरच आरोग्य, आर्थिक, सामाजिक, जागतिक असे विविध विषय असावेत जेणेकरून प्रत्येक अधिकारी-कर्मचारी येण्यास उत्सुक राहील.

कार्यालयाची इमारत, संग्रहालय, खुले प्रदर्शन, यंत्रणेची माहिती देणारे संकेतस्थळ, कार्यालयामध्ये वापरात येणारे तंत्रज्ञान, त्याचा जतन केला जाणारा अतिशय मोठा डेटाबेस, जिल्हा-तालुकस्तरावर होणारी भूजल विषयक संशोधन व पाणी उपल्ब्धतेची कामे इत्यादी व

अनेक उत्सुकतापूर्ण विषयांनी मला या कार्यालयासाठी पूर्वी आलेल्या एकसुरीपणास घालवून नावीन्याची संजीवनी रूजविण्यासाठी नेहमीच आतुर केले आहे.

या स्मरणिकेत भूजल यंत्रणेमध्ये वर्ष २०१७ -१८ या कालावधीत झालेल्या विशेष उल्लेखनीय कामांचा आढावा थोडक्यात मांडण्यात आला आहे. केलेल्या कामाचे डॉक्युमेंटेशन व्हावे, ती स्मरणात रहावीत व भूजल यंत्रणेच्या पुढील पिढीला याबाबत माहिती मिळावी आणि नवनवीन उपक्रम हाती घेण्यास प्रोत्साहन मिळावे, हाच या स्मरणिकेच्या प्रकाशनामागचा उद्देश आहे.

**या ४८व्या वर्धापन दिनी सर्व अधिकारी-कर्मचारी वर्गास माझ्याकडून कोटी-कोटी शुभेच्छा...!!**

**शेखर गायकवाड** आय.ए.एस.

# भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेबाबत थोडक्यात ...

भूजल सर्वेक्षण अणि विकास यंत्रणेची स्थापना १६ जुलै १९७१ साली झाली. पूर्वी हे खाते महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामध्ये कार्यरत होते. या यंत्रणेमार्फत सुरूवातीचे काळात भूजलावर आधारित लघु सिंचन योजनांच्या विकासाची कामे केली जात होती. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत असणा-या विंधण विहिरी व हातपंप यांचे निर्माण हे या यंत्रणेचे मुख्य आहे.

भू.स.वि.यं. मार्फत राज्यातील भूजलांच्या संसाधनांचे अन्वेषण, विकास आणि वाढ यांचेशी निगडीत कामे केली जातात. यामध्ये भूजल स्त्रोतांचा शोध करून, भूजल पुनर्भरणाचे प्रकल्प, पेयजलाच्या विंधण विहिरींचे सर्वेक्षण, भूजल उपलब्धतेचा अभ्यास तसेच जनतेला तांत्रिक मार्गदर्शन करणे आणि भूजल संसाधनांचे संरक्षण करणेसाठी महाराष्ट्र राज्यात भूजल कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये प्रमुख भूमिका इत्यादी कामे केली जातात.

राज्यातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीसाठी या खात्यामध्ये राज्यस्तरीय व विभागीय स्तरावर पाणी नमुना तपासणीच्या प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळा एन.ए.बी.एल. प्रमाणित आहेत. तसेच जिल्हा व तालुका पातळींवर सुद्धा लहान लहान प्रयोगशाळा चालू केल्या आहेत. त्याद्वारे पाण्याच्या गुणवत्तेचा अभ्यास व जनजागृती करून पाणी शुद्धीकरणासाठी उपाययोजना सुचविण्याचे कामकाज केले जाते.

भू.स.वि.यं. विविध संस्थात्मक अर्थसहाय्य योजनांनुसार गावपातळीवर सखोल भूजलशास्त्रीय सर्वेक्षण तसेच भूजल पातळी आणि पाण्याची गुणवत्ता यांची महिती गोळा करून दर 3-5 वर्षांनी भूजल मूल्यांकन अहवाल तयार करणेत येतो. त्याद्वारे निष्कर्ष व विश्लेषणाचे कामकाज, भूगर्भातील पाणी वापराचे नियमन याबाबत निर्णय घेतले जातात.

भू.स.वि.यं. मार्फत डोंगरी, दुर्गम, आदीवासी भागातील, पाणी पुरवठा योजनांपासून वंचित असलेल्या लहान सहान वाड्या-वस्त्या, तांडे, पाडे या ठिकाणी सौर उर्जेचा वापर करून अस्तित्वातील विंधण विहिरींवर दुहेरी पंप व्यवस्था करून ‘लघु नळ पाणी पुरवठा योजना’ राबविल्या जातात.

कमी पाणी असलेल्या किंवा कालांतराने कमी पाणी झालेल्या विंधण विहिरींचे जल भंजन तंत्रज्ञानाने विंधण विहीरीत अति उच्च दाबाचे पाणी इंजेक्ट करून खडकातील भेगा, फटी निर्माण करणे अथवा अस्तित्वातील भेगा, फटींचे विस्तारीकरण केले जाते व त्यामुळे विंधण विहिरींची पाणी क्षमता वाढण्यास मदत होते. यासाठी यंत्रणेकडे शासकीय जलभंजन यंत्रे उपलब्ध आहेत.

या व्यतिरिक्त या यंत्रणेमार्फत जलविज्ञान प्रकल्प, जलस्वराज्य प्रकल्प, जलयुक्त शिवार, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम इत्यादी प्रकल्प राबविले जातात.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची कार्यालये**

1. संचालनालय - पुणे येथे राज्य स्तर
2. उपसंचालक - विभागीय स्तरावर - पुणे , कोकण , नाशिक , औरंगाबाद , अमरावती , नागपूर.
3. वरिष्ठ भूवैज्ञानिक व उपअभियंता कार्यालये - जिल्हा स्तर

**मनुष्यबळ**

शासन निर्णय दिनांक ४ फेब्रुवारी २००५ नुसार एकूण मंजूर पदे : १५५१

# भूजल यंत्रणेच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे...

1972 : स्वतंत्र संचालनालय

1974 : गावनिहाय सखोल भूजलशास्त्रीय सर्वेक्षणाची सुरुवात

1978 : टंचाई निवारणासाठी पिण्याच्या पाण्याकरीता विंधण विहिर खुदाई कार्यक्रम

1983 : टंचाई दरम्यान पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी सर्वोच्च प्राथमिकता

1986 : संशोधन आणि विकास कक्षाची स्थापना

1986 : विशेष प्रकल्प विभाग स्थापना

1993 : ग्राम विकास विभागाअंतर्गत काम केले

1993-94 : जलसंधारण विभागाच्या अंतर्गत काम केले

1994 : पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाकडे हस्तांतरित

1995 : महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम, 1993 आणि नियम, 1995 अंतर्गत तांत्रिक मार्गदर्शकाची भूमिका

1997 : भूजल अधिनियम 1993 आणि नियम 1995 अंमलात आले.

2000 : जलविज्ञान प्रकल्प सुरु

2002 : 73 व्या दुरुस्तीनुसार पाणीपुरवठा संबंधित कार्यक्रम जिल्हापरिषदेला हस्तांतरीत करण्यात आले

2003 : तांत्रिक सेवा प्रदाता आणि सहभागी ग्रामीण मूल्यांकन कार्यकलाप सुरु झाले

2004 : माहिती, शिक्षण आणि दळणवळण (IEC) क्रियाकलाप सुरु झाल्या

2005 : ग्रामीण स्तरावर पाण्याच्या ताळेबंदाची सुरूवात

2006 : महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाचा आरंभ

2007 : जलविज्ञान प्रकल्प दुसरा टप्पा सुरु

2014 : जल स्वराज्य प्रकल्प टप्पा 2 सुरु झाला

2014 : महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम 2009 अंमलात आला.

2015 : आरोग्य विभागाकडील उप विभागीय प्रयोगशाळा भूसवियं कडे हस्तांतरीत.

2016 : जलविज्ञान प्रकल्प टप्पा 3 सुरु झाला

# महाराष्ट्र राज्य संचालक...




श्री. आर. वेंकटरमन
१५.११.७२ ते १२.०४.७३




श्री. बी. एस. करकरे
१३.०४.७३ ते ०३.१२.८० व
२०.०८.८१ ते ०६.०४.८६




श्री. पी. एन. जगताप (प्रभारी)
०४.१२.८० ते १९.०८.८१



श्री. व्ही. बी. माथनकर
(आय.ए.एस.)
०७.०४.८६ ते ०८.०१.८७



श्री. शिवाजीराव देशमुख
(आय.ए.एस.)
०९.०१.८७ ते १९.०६.८८



श्री. बी. जी. ढोकरीकर
२०.०६.८८ ते ३१.१२.९१



श्री. सी. एन. मग्गीरवार
०१.०१.९२ ते ३०.१०.९३



श्री. एम. एम. सरभुकन
०१.११.९३ ते ३१.०५.९६



श्री. एफ. जे. जाधव (प्रभारी)
(०१.०६.९६ ते १९.०९.९६), (०१.०७.९७ ते ०९.०७.९७) आणि (०१.१०.२००० ते १५.०५.२००२)




श्री. एस. जे. बागडे
२०.०९.९६ ते ३०.०६.९७



श्री. भूषण गगरानी, (आय.ए.एस.)
१०.०७.९७ ते २३.०९.९७



श्री. व्ही. गिरीराज (आय.ए.एस.)
२४.०९.९७ ते १६.०४.९८




श्री. महेश पाठक (आय.ए.एस.)
१७.०४.९८ ते ३१.०७.९९




श्री. अरूण भागडे, (आय.ए.एस.)
२०.०८.९९ ते ३०.०९.२०००



श्री. राधेश्याम मोपलवार (आय.ए.एस.)
१६.०५.२००२ ते २१.१२.२००४



श्री. प्रविण दराडे, (आय.ए.एस.)
२२.१२.२००४ ते ११.०४.२००५



श्री. वसंत पोरेड्डीवार, (आय.ए.एस.)
१२.०४.२००५ ते २९.०७.२००६



श्री. सूर्यकांत बागडे (प्रभारी)
२९.०७.२००६ ते २७.०५.२००७



श्री. विकास खारगे, (आय.ए.एस.)
२८.०५.२००७ ते २०.०९.२००९



श्री. धीरजकुमार (आय.ए.एस.)
(प्रभारी)
२१.०९.२००९ ते ३०.११.२००९



श्री. के. एम. नागरगोजे,(आय.ए.एस.)
०१.१२.२००९ ते २९.०६.२०१२



श्री. एस. बी. खंडाळे (प्रभारी)
३०.०६.२०१२ ते ०३.०७.२०१२



श्री. प्रविण गेडाम, (आय.ए.एस.)
०३.०७.२०१२ ते २४.०१.२०१३



श्री. एस. बी. पाटील (आय.ए.एस.)
(प्रभारी)
२५.०१.२०१३ ते १८.०२.२०१३



श्री. रूपींदर सिंह, (आय.ए.एस.)
१८.०२.२०१३ ते ०६.०८.२०१६



श्री. संतोष कुमार (आय.ए.एस.)
(प्रभारी)
०७.०८.२०१६ ते १७.०८.२०१६



श्री. सुनील पाटील (आय.ए.एस.)
१८.०८.२०१६ ते १५.०६.२०१७



**श्री. शेखर गायकवाड (आय.ए.एस.))**
**१५.०६.२०१७ (विद्यमान)**

# भूजल यंत्रणेची बलस्थाने...

- **आय. ए. एस. संचालक:**

  आय.ए.एस. पातळीवरील अधिकारी मुख्य पदावर लाभणे हे कोणत्याही कार्यालयाचे दृष्टीने अत्यंत लाभाची बाब असते. या अधिका-यांचे विविध क्षेत्रातील अनुभव, त्यांची सतत नाविन्यासाठी चालणारी धडपड, कर्मचा-यांविषयी व्यापक दृषीकोन, प्रशासकीय कामातील गती या सर्वांचा यंत्रणेच्या कामकाजातील गती वाढणेस मदत होते व अधिकारी, कर्मचारी वर्गासदेखील त्यांचे प्रभावामुळे स्फूर्ती मिळते.

- **स्वतंत्र इमारत:**

  यंत्रणेचे स्वतंत्र संचालनालय असून सुसज्ज आणि भव्य अशी स्वतःची इमारत आहे.

- **उच्च शिक्षित कर्मचारी:**

  यंत्रणेकडे उच्च शिक्षित व अनुभवी भूवैज्ञानिक अधिकारी, भूभौतिक तज्ञ आणि अभियंते कार्यरत आहेत.

- **डेटाबेस सेंटर**
  - यंत्रणेकडे २५,००० गावांचे १:१०,००० स्केल वर भूजल आणि भूगर्भीय नकाशे व जीआयएस स्वरूपात डिजिटल डाटाबेस उपलब्ध आहे.
  - आधुनिक रिमोट सेन्सिंग साधने आणि स्वयंस्पष्ट माहिती देणारे नकाशे उपलब्ध आहेत.
  - यंत्रणेच्या नियंत्रणाखाली ३९२० निरीक्षण विहिरींचे व ११५० पिझोमीटरच्याद्वारे गोळा करणेत आलेल्या भूजल पातळीची 32 वर्षांहून अधिक काळाची माहिती उपलब्ध आहे.

- **यंत्रसामुग्री:**
  - यंत्रांच्या उप्लब्धतेची अडचण असलेल्या जिल्ह्यांमध्ये अथवा ठिकाणी आवश्यकतेनुसार विंधण विहिर खुदाईची कामे करण्यासाठी ५ उच्च वेगाने विंधण काम करणारी विंधण यंत्रे उपलब्ध आहेत.
  - राज्यात कमी पाण्याच्या विंधण विहिरींची पाणी क्षमता वाढविणेसाठी एकूण ११ जलभंजन यंत्रे कार्यरत आहेत.
  - सर्व जिल्ह्यांमध्ये व राज्य पातळीवर अत्याधुनिक संगणक आहेत.
  - भू-भौतिक सर्वेक्षणासाठी आधुनिक साधने, ज्यात रेजीस्टीव्हीटी मीटर, व्हीएलएफ वाडी, भूकंप एकक (Seismic unit) आणि डिजिटल लॉगर इत्यादी उपकरणे सामाविष्ट आहेत.

- **प्रयोगशाळा:**
  - पाणी गुणवत्ता तपासणीसाठी राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर एन.ए.बी.एल. प्रमाणित आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा प्रयोगशाळा आहेत.
  - तसेच जिल्हा आणि तालुका स्तरांवरही प्रयोगशाळा जाळे आहे.
  - येथे भूजल व पाणी गुणवत्तेसाठी लाखोहून अधिक नमुन्यांची तपासणी करुन डेटाबेस जतन केला जातो.

- **प्रदर्शनी:**

  यंत्रणेचा स्वतःचा भूजलाबाबत, भूजल पुनर्भरण, विविध खडकांचे प्रकार, यंत्रसामुग्री, नकाशे इत्यादीबाबत माहिती देणारा प्रदर्शन कक्ष व इमारतीचे परीसरात वेगवेगळ्या हातपंप, विंधण यंत्र, सौरउर्जेवर आधारित योजना, छतावरील पाऊस पाणी संकलन, रिचार्ज शाफ़्ट इ बाबत माहिती देणारी खुली प्रदर्शनी उपलब्ध आहे.

# वर्ष २०१७-१८ मध्ये झालेली वैशिष्ट्यपूर्ण कामे...

- स्त्रोत बळकटीकरणाची कामे
- सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठायोगजा
- आर्थिक प्रगती
- जलभंजन कामे
- प्रदर्शन हॉल नूतनीकरण व विस्तृतीकरण
- इमारत परिसरात भूजलाबाबत खुले प्रदर्शन
- “भूजल भवन” इमारतीचे सुशोभिकरण
- ज्ञानकेंद्र उपक्रम
- मा. संचालकांचा इस्त्रायल दौरा
- संगणक कक्ष अद्ययावतीकरण
- शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यालयामध्ये भूजलाबाबत माहिती देणारे खुले प्रदर्शन
- दूरदर्शन वाहिनीवर यंत्रणेची माहिती देणेसाठी मुलाखत व लघुपट
- प्रयोगशाळा अद्ययावतीकरण
- जलस्वराज्य व जलविज्ञान प्रकल्प
- संकेत स्थळ अद्ययावतीकरण
- प्रयोगशाळा बळकटीकरण व त्याचे एन.ए.बी.एल. प्रमाणिकरण
- प्रजासत्ताक दिनी सौर उर्जा आधरित देखावा व चित्ररथ
- विविध व्यावसायिक व अव्यावसायिक प्रदर्शनांमध्ये यंत्रणेचा सहभाग
- यंत्रणेच्या सुधारित आकृतीबंधासाठी प्रयत्न
- कोर्ट केसेसचा निपटारा
- कर्मचा-यांना पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ
- फोटोसह सेवा ज्येष्ठता याद्यांचे प्रसिद्धिकरण
- ऐतिहासिक व भारतातील पहिल्या बोरवेल मशीनचे प्रदर्शन
- कार्यालयाबाहेर भूजल साक्षरतेसाठी कायमस्वरूपी खुले प्रदर्शन

# भूजल सर्वेक्षणच्या कामाची माहिती प्रसारण माध्यमांचे मदतीने प्रसिद्धी

## पाण्याच्या विंधन यंत्राच्या इतिहासाला उजाळा

### १९७२ च्या दुष्काळात खोदल्या १ हजारांहून अधिक विहिरी; युनिसेफकडून भेटस्वरूपात मिळाली होती ६ यंत्रे

पुणे : प्रतिनिधी

राज्यासह देशात १९७२ रोजी पडलेल्या भीषण दुष्काळात राज्यातील जनतेची पिण्याच्या पाण्याची तहान भागविणाऱ्या पहिल्या पाण्याच्या विंधन यंत्राचा (हॅल्को टायगर) इतिहास उजळला आहे. गेल्या काही महिन्यांपासून अडगळीत पडलेल्या या यंत्राला राज्याच्या भूजल सर्वेक्षण व विकास विभागाच्या प्रांगणात ठेवण्यात आले असून, यंत्राने केलेल्या उल्लेखनीय कार्याच्या माहितीचा फलकही विभागाच्या वतीने लावण्यात आला आहे.

याबाबत भूजल सर्वेक्षण व विकास विभागाचे संचालक शेखर गायकवाड म्हणाले, १९७२ पूर्वी विहिरीपेक्षा थोडे खाली जमिनीखालचे पाणी काढण्यासाठी देशात कोणतेही तंत्र तसेच कोणतीही आधुनिक यंत्रसामग्रीही नव्हती; तर फक्त खाणीमध्ये मातीचा नमुना घेण्यासाठी विंधन यंत्राचा वापर होत होता. त्यानंतर, या विंधन यंत्रामध्ये बदल करत तिचा पाण्यासाठी वापर कसा करता येईल या दृष्टीने तिची रचना करण्यात आली. दरम्यान, भारतात १९७२ मध्ये दुष्काळ पडल्यानंतर युनिसेफच्या वतीने इंग्लंड येथील हालीफॅक्स टूल कंपनीच्या सहा विंधन यंत्र (हॅल्को टायगर) देशाला



देशातील पहिले विंधन यंत्र- हॅल्को टायगर.

भेटस्वरूपात देण्यात आले. त्यापैकी उच्च क्षमतेचे, दणकट, स्वयंचलित व वाहतुकीस सुलभ असे एक विंधन यंत्र महाराष्ट्र राज्याला उपलब्ध करून देण्यात आले. ११५ मि. मी. व्यासाची व ८५ मीटरपर्यंत खोल विंधन विहीर खोदण्याची क्षमता असणाऱ्या या यंत्राने त्याकाळी राज्यात १ हजारांहून अधिक बोअरवेल्स खोदल्या. तब्बल २२ वर्षे राज्यातील विविध ठिकाणी पाणी उपलब्ध करून ठेवणाऱ्या या यंत्राने देशाच्या इतिहासात एक ओळख निर्माण केली आहे.

दुष्काळ काळात डोंगराळ भागात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी या यंत्राचा वापर अधिक झाला. त्याकाळात हे सर्वात वेगवान विंधन यंत्र होते. त्याचा सेटअप टाईम १० मिनिटे असून त्याद्वारे कठीण खडकात, कमी वेळात ताशी २० मीटर वेगाने अंतर्भेद केला जातो. तसेच तब्बल साडेतीन ते चार टन वजन असलेले हे विंधन यंत्र केवळ एकच माणूस हाताळू शकत होता. या यंत्राने भयानक दुष्काळी परिस्थितीत संपूर्ण महाराष्ट्रात तसेच देशातील काही भागात विंधन विहिरीद्वारे भूगर्भातील पिण्याचे पाणी उपलब्ध करून देऊन एक क्रांती निर्माण केली होती. यंत्राने केलेल्या उल्लेखनीय कामामुळे महाराष्ट्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने स्मृती स्वरूपात त्याचे जतन केले असल्याचेही गायकवाड यांनी नमूद केले.

---

## कलियुगात रामायण काळातील पाण्याचा वापर

- सहाशे फूट खोल बोर खोदू नका
- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून जनजागृती

नागपूर, १६ फेब्रुवारी

सातबारा माझा म्हणून सर्व नैसर्गिक संपत्ती आपलीच अशाच आविर्भावात राहून शेतकरी भूगर्भातील पाण्याचा प्रचंड प्रमाणात उपसा करीत आहेत. परंतु, सातबारा तुमचा म्हणून पाणी तुमचे नाही. हे सत्य नाकारून महाराष्ट्रात सुमारे ६०० फुटांपेक्षा जास्त बोर करून पाण्याचा उपसा केला जात आहे. जमिनीतील ६०० फुटांपेक्षा खालचे पाणी हे रामायण काळात म्हणजे सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी जमा झाले होते.



तेवढे पाणी आपण भूगर्भात टाकले तर नाहीच, परंतु उपसा मात्र सुरू केला आहे. अर्थात कलियुगात रामायण काळातील पाण्याचा वापर मानवाने सुरू केल्याची धक्कादायक माहिती भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य पुणे येथील संचालक शेखर गायकवाड यांनी तभाशी बोलताना दिली.

नागपुरात जल संसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण मंत्रालय भारत सरकारमार्फत सुरू झालेल्या दोन दिवसीय 'भूजल मंथन' परिषदेत शेखर गायकवाड यांनी आपल्या खात्याची संपूर्ण माहिती सादर केली. यावेळी त्यांनी टिंब्या आणि थेंबू काकाची कथा चित्रफितीद्वारे जलचक्र सादर करून उपस्थितांना पाण्याचे महत्त्व पटवून दिले. पिण्याचे पाणी हे नेहमीच शुद्ध असावे. याकरिता आमच्या विभागामार्फत वर्तमानात १५० प्रयोगशाळा शाखा कार्यालय पातळीवर सुरू आहेत. पुढील काळात ती संख्या १८० ने वाढणार असल्याचेही शेखर गायकवाड यांनी स्पष्ट केले.

टिंब्या आणि थेंबू काका यांच्यातील संवाद तर अप्रतिमच होता. यात त्यांनी पृथ्वी नेमकी कशी तयार झाली, यावर प्रकाश टाकला. ज्वालामुखीमुळे दख्खनचे अद्भुत असे पठार तयार झाल्याचे सांगण्यात आले. आकाशातून पडणाऱ्या थेंबापैकी २५ वाहून जातात. ३५ ची वाफ होते. फक्त १० जमिनीत जातात. असे हे पाण्याच्या थेंबाचे समीकरण मांडून आज पाण्याचे पुनर्भरण कसे आवश्यक आहे, याकडे लक्ष वेधले.

(तभा वृत्तसेवा)

---

पुढारी

## अतिदुर्गम भागात सौरऊर्जेवरील पाणीपुरवठा ठरतोय वरदान

### ८ वर्षांत ४ हजारांहून अधिक वाड्या-वस्त्यांना नळाने पाणी; नागपूरपाठोपाठ अमरावती, पुणे विभागात सर्वाधिक योजना, दुहेरी पंप लघुनळाचा वापर

शंकर कवडे

पुणे : राज्यातील ग्रामीण, नक्षलग्रस्त, डोंगरी, दुर्गम आदिवासी भागात परिस्थितीनुसार विखुरलेल्या वाड्यावस्त्यांसाठी लोकवस्त्यांनाही सौरऊर्जेवर आधारित दुहेरी पंप लघू नळ पाणीपुरवठा योजना वरदान ठरत आहे. राज्य सरकारच्या भूजल सर्वेक्षण व विकास विभागाच्या वतीने गेल्या ८ वर्षांत राज्यातील ४ हजारांहून अधिक लोकवस्त्यांना या योजनेद्वारे शाश्वत पाण्याचा पुरवठा सुरू आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून पाण्यासाठी सुरू असलेली पायपीट थांबल्याने या योजनेचा लाभ मिळालेल्या लोकवस्त्यांवरील नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

पुढारी अँकर

राज्यात विंधन विहिरीवर अवलंबून असलेल्या वाड्या; तसेच वस्त्यांना पाणीपुरवठा व्हावा, या उद्देशाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २००९ पासून दुहेरी पंप लघू नळ पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली. योजनेच्या सुरुवातीच्या टप्प्यात विद्युतपुरवठ्यावर ही योजना राबविण्यात आली. मात्र, बहुतांश ठिकाणच्या वाड्यावस्त्यांवर विजेची सुविधा नव्हती; तसेच त्याचे वीज देयक परवडणारे नव्हते. सुरुवातीच्या काळात राज्यातील ६ विभागांतील ३३ जिल्ह्यांमध्ये २००९-१० मध्ये २ तर २०१०-११ मध्ये १६५ दुहेरी नळाची जोडणी देण्यात आली. मात्र, त्यानंतर राज्य शासनाने २०११-१२ वर्षापासून सौरऊर्जेचा वापर करून दुहेरी पंप लघू नळाने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली. त्यानंतर वर्षभरात तब्बल १ हजार ५६ वस्त्यांनी या योजनेचा लाभ घेऊन पाण्याची तहान भागविली.

सद्यःस्थितीत राज्यातील कोकण विभागात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये ५६९, नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर ४४१, पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर ६०५, औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड १ हजार १०७, अमरावती विभागातील अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, अकोला, वाशिम १८३, तर नागपूर विभागातील जिल्ह्यांमध्ये नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आदी जिल्ह्यांमध्ये १ हजार २८४ याप्रकारे गेल्या आठ वर्षांत तब्बल ४ हजार १८९ प्रकल्प उभारण्यात आले आहेत. नागपूर विभागातील गोंदियामध्ये सर्वाधिक ३८७, तर अमरावती विभागातील अकोला जिल्ह्यामध्ये सर्वात कमी ५ ठिकाणी ही योजना राबविण्यात आली असल्याची माहिती भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे संचालक शेखर गायकवाड यांनी दिली.

**अशी उभारण्यात येते यंत्रणा**

सौरऊर्जेवर आधारित दुहेरी पंप लघू नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विंधन विहिरीवर हातपंपासमवेत सौरपंपाची उभारणी करण्यात येते. सौरऊर्जा पंपाचा उपसा साठवण टाकीत साठवून पाईपलाईनद्वारे घरोघरी पाणी पोहोचते. हातपंप व सौरपंपाची उभारणी स्वतंत्ररीत्या विंधन विहिरीत केली असल्याने हातपंप नादुरुस्त झाल्यास सौरपंपाद्वारे किंवा सौरपंप नादुरुस्त झाल्यास हातपंपाद्वारे अव्याहतपणे पाणीपुरवठा सुरू राहतो. ही योजना सौरऊर्जेवर आधारित असल्याने विद्युतभाराचा खर्च नाही. शिवाय, देखभाल दुरुस्तीसाठी अत्यंत सुलभ असते.



---

२० आपलं नागपूर — तरुण भारत

## भूजल मंथनचे शिलेदार

दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी प्रयत्न : विजय वर्धन

तामसवाडामुळे १२०० हेक्टर जमीन तृप्त

कलियुगात रामायण काळातील पाण्याचा वापर

वसुंधरेच्या गर्भाचा वेध घेणारे तंत्रज्ञान





आता पूलही अडविणार वाहून जाणारे पाणी

पाण्याच्या बचतीसाठी नाबार्डही सक्रिय


जुने फर्नीचर फेका ना, नवे फर्नीचर घेऊन जा!
Nilkamal
M/s. NIRMAL HOME DECOR


---

## 'भूजल विभागा'नुसारच 'जलशिवार'ची कामे

पुणे, ता. २५ : भूजल पातळी वाढविण्यासाठी राज्य सरकारच्या 'जलयुक्त शिवार योजने'तून झालेली बहुतांश कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने केली नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे या पुढील काळात 'भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा' विभागाच्या निर्देशानुसार ही योजना प्रभावीपणे अमलात आणण्यात येणार आहे. त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय नुकताच घेण्यात आला आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीवर मात करण्यासाठी भूजल पातळीत वाढ होणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून 'जलयुक्त शिवार' ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली. मात्र, या योजनेंतर्गत आवश्यकता नसलेल्या ठिकाणीदेखील कामे केली जात असल्याचे समोर आले आहे. तसेच बहुतांश कामे अशास्त्रीय पद्धतीने केलेल्या जलयुक्त शिवारच्या कामांबाबत न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती. त्यावर राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात 'भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा' विभागाचे (जीएसडीए) संचालक शेखर गायकवाड म्हणाले, ''जलसंधारणाची कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. बेसाल्ट खडकावर पाणी ओतले, तर जमिनीच्या खाली जात नाही. त्यामुळे खडकांची रचना पाहून भूजल पातळी वाढीसाठी काम करण्याची आवश्यकता आहे. जमिनीखाली खडक फोडून ६० ते ७० फूट नाला खोलीकरण करणे योग्य नाही. जलसंधारणाची कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने केली जावीत याबाबतच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. पुढील काळात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाच्या मार्गदर्शनानुसार ही कामे करण्याचा निर्णय घेण्यात आला.

"जीएसडीएने खडकाच्या माहितीसह सुमारे दीड हजार पाणलोट क्षेत्राचे नकाशे तयार केले आहेत. ज्या खडकांमध्ये पाणी मुरते अशाच परिसरात जलयुक्त शिवारची कामे करणे आवश्यक आहे. राज्यातील ८२ टक्के शेती ही भूजलावर आधारित आहे. त्यामुळे भूजल पातळी वाढीवर काम करण्याची आवश्यकता आहे. राज्यातील ३२ हजार गावनिहाय नकाशे संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहेत.

– शेखर गायकवाड, संचालक, 'भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा' विभाग (जीएसडीए)

---

रविवारची मुलाखत – संदीप नवले

## राज्यातील भूजल स्थिती चिंताजनक

राज्यात भूगर्भातील पाण्याची घटलेली पातळी ही समस्या उग्र होत चालली आहे. पाणीटंचाई ही भविष्यात मोठी समस्या होणार आहे, असे एकंदरीत चित्र दिसत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील भूजल पातळीचे सर्वेक्षण आणि या भूजलाचे संवर्धन करण्यासाठी सुरू असलेले काम महत्त्वपूर्ण आहे. राज्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए) हा स्वतंत्र विभाग त्यासाठी काम करतो. या यंत्रणेचे कार्य आणि आगामी नियोजन याविषयी यंत्रणेचे संचालक शेखर गायकवाड यांच्याशी केलेली ही बातचीत.

**? भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए) नक्की कोणते काम करते?**

आपण गेल्या शंभर वर्षांपासून मोठी व मध्यम धरणे, पाटबंधारे प्रकल्प बांधत आहोत; परंतु तरीदेखील आपण सरासरी १६ ते १७ टक्क्यांच्या पलीकडे सिंचन क्षमता निर्माण करू शकलो नाही. त्यामुळे मुख्यतः जमिनीखालच्या पाण्यावर महाराष्ट्रातील शेती अवलंबून आहे. त्यामुळे या जमिनीखालील पाण्याचे (भूजल) नियमन करण्याचे काम महत्त्वाचे आहे. देशातील काही निवडक राज्यांमध्येच जमिनीखालील पाण्याचे सर्वेक्षण व विकास करणाऱ्या यंत्रणा स्वतंत्ररीत्या अस्तित्वात आहेत. ...

शिवाय, राज्याची भौगोलिक स्थिती पाहिली, तर इथली भूस्तरीय संरचना ही भूजलाचा साठा व पाणी वहनाच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल आहे. राज्याचा ९२ % भूभाग हा अत्यंत कठीण खडकाने व्यापलेला आहे. राज्याची भूभौतिक रचनाही भूजलाच्या संचयाच्या दृष्टीने प्रतिकूल आहे. ...

**? राज्यात 'जीएसडीए'ने केलेली ठळक कामे कोणती?**

'जीएसडीए'ने गेल्या ३७ वर्षांत ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी सुमारे अडीच लाख विंधन विहिरी खोदल्या. सुमारे दोन लाख हातपंप आणि १३ हजार वीजपंपांच्या माध्यमातून ...



पाणलोटाचे नकाशे तयार करण्यात आले. तसेच जवळ जवळ ८०० जलधारक खडक क्षमता चाचण्या घेण्यात आल्या. एक हजार ५०५ पाणलोटातील भूजलधारक खडकांच्या साठवणुकीच्या मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. राज्यातील चार हजार ५२६ गावांत सहा हजार ८७२ उपाययोजनांच्या माध्यमातून भूजलाधारित पेयजल स्रोतांचे बळकटीकरण केले. जागतिक बँकेच्या साहाय्याने राबविण्यात येत असलेल्या जलविज्ञान प्रकल्पातून भूभौतिक माहितीचे जाळे विकसित करण्यात आले आहे. या कामगिरीबद्दल 'जीएसडीए'चा देश पातळीवर सन्मान करण्यात आला.

**? भूजल पातळीचे नकाशे उपलब्ध आहेत का?**

राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल अभियानातून राज्यातील ४३ हजार २६५ गावांचे भूजल पुनर्भरण उपयुक्त क्षेत्रांचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. www.gsda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हे नकाशे उपलब्ध करून दिले आहेत. या नकाशांचे वाचन ग्रामसभेसमोर करण्याची गरज आहे. ...

**? राज्यात भूजलाचा उपसा प्रचंड वाढला आहे, त्याविषयी काय सांगाल?**

**? भूजल पातळी वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात?**

**? पिण्याच्या पाण्याच्या शुद्धतेविषयी 'जीएसडीए' कडून कोणते काम केले जाते?**

शेखर गायकवाड

shekhargaikwad@yahoo.com

**राज्यातील भूजल पातळीची सद्यःस्थिती काय आहे?**

https://gsda.maharashtra.gov.in ...

---

## धुळ्यातील 'शिरपूर पॅटर्न' अयोग्य : शेखर गायकवाड

सोलापूर, ता. ६ : जलसंधारणाच्या कोणत्याही कामांसाठी दोन ते अडीच मीटरपेक्षा अधिक खोलीकरण अयोग्य आहे. नदी, नाले, ओढ्यांचे पुनर्जीवन करताना दोन मीटरपेक्षा अधिक खोलीकरण करू नये, अशी शिफारस भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने सरकारला केली असल्याची माहिती यंत्रणेचे संचालक शेखर गायकवाड यांनी दिली.



गायकवाड

सोलापूर दौऱ्यावर आल्यानंतर गायकवाड यांनी गुरुवारी 'सकाळ'च्या सोलापूर कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. 'सकाळ'चे सहयोगी संपादक अभय दिवाणजी व युनिट व्यवस्थापक किसन दाडगे यांनी त्यांचे स्वागत केले. धुळ्यातील शिरपूर तालुक्यात राबविण्यात आलेला जलसंधारणाच्या 'शिरपूर पॅटर्न'मध्ये ओढ्यांचे खोलीकरण ५० ते ७० फुटांपर्यंत करण्यात आले आहे. बेसाल्टचा खडक ब्लास्टिंग करून फोडण्यात आला आहे. ही पद्धत तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

# भूजल सर्वेक्षणच्या कामाची माहिती प्रसारण माध्यमांचे मदतीने प्रसिद्धी

## गावनिहाय समजणार दैनंदिन भुजल पातळी

पुणे (सकाळ वृत्तसेवा) : अनियमित पाऊस, बेसुमार उपसा, अशास्त्रीय पद्धतीने जलसंधारणाची कामे केल्यामुळे पाणी जमिनीत मुरत नाही; तसेच पावसाचे पाणी वाहून गेल्यामुळे भूगर्भजल पातळी मोठ्या प्रमाणात घटत असल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. 'युनिसेफ'च्या मदतीने राज्य भूजल सर्वेक्षण विभागाचा 'वेळसापेक्ष भूजल सर्वेक्षण' (रिअल टाइम ग्राउंडवॉटर सर्वे) प्रकल्प नुकताच पूर्ण झाला आहे. या अंतर्गत राज्यातील सुमारे ३३ हजार ८५५ विहिरींचे निरीक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार आता दैनंदिन गावनिहाय भूजलपातळी समजू शकणार आहे. त्याआधारे आता पीक घेण्याची पद्धती, जलनियोजन करता येऊ शकणार आहे. आगामी काळात मोबाईल ॲपवरही शेतकऱ्यांना गावनिहाय भूजलपातळी समजू शकणार आहे.

देशातील भूजल पातळीचे अचूक, शास्त्रीय माहिती तयार करण्याचे काम २०१४ पासून सुरू होते. 'युनिसेफ'कडून या प्रकल्पाला १२ लाख रुपयांचे अर्थसाह्य करण्यात आले होते. तीन वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर हा प्रकल्प पूर्ण झाला. राज्यात पहिल्यांदा प्रायोगिक पातळीवर चंद्रपूर येथील जिवती तालुक्यातील विहिरींची अचूक जलपातळी तक्ते तयार करण्यात आले.

### 'महाभूजलवेध' संकेतस्थळ



'महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन्स सेंटर'चे (एमआरसॅक) नकाशे आणि 'गुगल डिजिटल' नकाशांच्या साह्याने राज्यातील गावनिहाय दर किलोमीटरवरील भूजलपातळी कळू शकणार आहे. शेतकऱ्यांना कूपनलिका किंवा विहीर खोदण्यासाठी, पीक घेण्यासाठी त्यांच्या गावाचा भूजल पातळी तक्ता संकेतस्थळावर; तसेच मोबाईल ॲपवर पाहता येईल. येत्या ऑक्टोबरपासून हे तक्ते 'महाभूजलवेध' संकेतस्थळावर पाहता येतील; तसेच गेल्या तीन वर्षांमधील भूजलपातळीसुद्धा कळू शकणार आहे.

"ज्या त्या गावातील भूजल पातळीची अचूक माहिती शेतकऱ्यांना सांगितल्यास त्यांना पीक घेण्याचे जलनियोजन करणे सोपे होईल. दैनंदिन किंवा आठवडानिहाय भूजलपातळी संकेतस्थळावर, मोबाईलवर पाहता येईल.
- शेखर गायकवाड, संचालक, राज्य भूजल सर्वेक्षण व विकास विभाग

**हे शक्य होणार...**

- शेतकऱ्यांना कोणते पीक घ्यावचे हे ठरविता येणार
- मोबाईल ॲपवरही कळणार भूजल पातळी
- शेती, उद्योग, पिण्याच्या पाण्याचे अचूक नियोजन करता येणार
- नगदी पिके घ्यायची की नाही हेही ठरविता येणार

## 'ऑस्ट्रेलियन टँक'चा पाणीटंचाईवर तोडगा

Prashant.Aher
@timesgroup.com
Tweet : @PrashantAherMT



टंचाईवर भूजल विभागाचा उपाय

पुणे : ऐन उन्हाळ्यात छोट्या-मोठ्या वाड्या-वस्त्या तसेच गावांना भासणारी पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी भूजल विभागाने एक नामी संधी शोधली आहे. जागतिक बँकेच्या मदतीतून राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये ९४ 'ऑस्ट्रेलियन टँक' बांधण्यास सुरुवात केली असून त्यातील ५० टँक या महिनाअखेरीस पूर्ण होतील.

सुमारे एक लाख ते तीन लाख लिटर पाणी साठविण्याची क्षमता असलेल्या या टँकची बांधणी केवळ तीन तासांमध्ये करता येते. यामध्ये डिसेंबर महिन्यांत पाणी साठवून ठेवायचे आणि पुढे उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या काळात वापरायचे, असे नियोजन आहे. जगात सर्वप्रथम हा प्रयोग ऑस्ट्रेलियात करण्यात आला असल्याने या टँकला 'ऑस्ट्रेलियन टँक' असेही नाव पडले असल्याची माहिती भूजल विभागाचे संचालक शेखर गायकवाड यांनी दिली. या महिन्यांत ५० टाक्या बांधण्याचे उद्दिष्ट आहे तर पुढील महिन्यांत उर्वरित ४४ टाक्या बांधून पूर्ण होतील, असा विश्वास गायकवाड यांनी व्यक्त केला.

राज्यात दर वर्षी उन्हाळ्यात अनेक गावे तहानलेली असतात. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत राज्यात मोठ्या प्रमाणात टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेच्या मदतीने पाणीपुरवठ्याच्या टाक्या बांधण्याचा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. राज्य सरकारने गेल्या काही वर्षांत पाणी पुरवठ्याच्या तीन महत्त्वपूर्ण योजना राबविल्या. मात्र, या योजना राबविल्यानंतरही पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटलेला नाही. अनेक गावे तहानलेलीच राहत असून त्यांना टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येते.

साधारण ५०० लोकसंख्या असलेली आणि टँकरने पाणीपुरवठा होणाऱ्या गावांमध्ये या टाक्या बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या टाक्या केवळ तीन तासांत बांधण्यात येतात. त्यासाठी चौथरा आधी बांधणे आवश्यक असते. त्यावर या टाक्या बांधण्यात येतात आणि त्या ७० ते ८० वर्षे टिकतात. या पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी साठविण्यात येते आणि गरजेनुसार त्याचा वापर करण्यात येतो. डिसेंबरमध्ये साठवलेले पाणी मार्चनंतरही वापरता येऊ शकते. पाण्याच्या दबाव सहज या टाक्या सहन करतात, असे गायकवाड म्हणाले.

## कवठेमहांकाळमध्ये महांकाली नदीचा शोध!

» पान १ वरून

तिचे महांकाली नदी असे नामकरणही केले. आता तिचे पुनरुज्जीवन करण्यात येत आहे. करलहट्टीपर्यंत या नदीची लांबी २२.५ किलोमीटर आहे. दुष्काळी जत आणि कवठेमहांकाळ तालुक्याच्या सीमेवरील एकूण २० गावे या नदीच्या पाणलोट क्षेत्रात येतात. यात कवठेमहांकाळमधील ११ आणि जतमधील ९ गावे आहेत. या नदीच्या बंधाऱ्याचे काम गेल्या ५० वर्षांत झालेले नाही. सध्या नदी पात्राच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे.

**पाच सदस्यीय समिती करणार मॉनिटरिंग**


शासनाच्या वतीने सुरू असलेले हे काम ४० लाख रुपयांचे आहे. या कामावर गावातील पाच ग्रामस्थांची समिती डॉ. राणा यांनी नेमली असून ती या कामावर मॉनिटरिंग करणार असून ते कामाची गुणवत्ताही तपासणार आहे. अग्रणी नदी बारमाही करण्यासाठी कवठेमहांकाळ तालुक्यातही नदीच्या पुनरुज्जीवनाचे काम सुरू आहे. महांकाली नदीही बारमाही प्रवाही करण्याचा प्रयत्न आहे.

पुढारी

## संग्रहालयातून भूगर्भातील रहस्यांचा होणार उलगडा

शंकर कवडे

- प्रात्यक्षिके तसेच डिजिटल स्वरूपात मिळणार भूजलाची माहिती
- जमिनीच्या पोटातील पाण्याचा प्रवासही अनुभवता येणार



पुणे : जमिनीखाली सच्छिद्र मातीत किंवा खडकांच्या भेगात किंवा पातळीखालील एखाद्या पोकळीत असलेल्या पाण्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. सद्य:स्थितीत भूगर्भात असलेल्या पाणीसाठ्यातून वापरण्यायोग्य पाणी अनेकांची तहान भागवत आहे. पावसामुळे जमिनीत पाण्याचे पुनर्भरण झाल्यानंतर पाण्याचा होणारा पुढचा प्रवास आता अंतर्गत व बाह्य संग्रहालयातून नागरिकांना अनुभवता येणार आहे. शिवाजीनगर येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल भवनात अत्याधुनिक अंतर्गत व बाह्य संग्रहालय उभारण्यात येत असून, यामुळे भूगर्भातील रहस्यांचा उलगडा होणार आहे.

भूजल विभागाच्या विविध उपक्रमांसह ऐतिहासिक यंत्रे, भूजल पातळीशी संबंधित माहिती प्रत्येकाला व्हावी, या उद्देशाने हे संग्रहालय साकारण्यात येत आहे. खुल्या संग्रहालयामध्ये १२ प्रकारचे विविध साहित्य ठेवण्यात येत आहे. १९७२ च्या दुष्काळामध्ये युनिसेफकडून भारताला भेट मिळालेल्या आठ विंधन यंत्रांपैकी राज्याला मिळालेले एक विंधन यंत्रामुळे सुरवातीचा काळ अनुभवता येणार आहे. सद्य:स्थिती बाह्य संग्रहालयाचे काम प्रगतिपथावर असून याठिकाणी हातपंपाचे विविध प्रकार, पाणी मोजण्याचे मीटर, रेनवॉटर हार्वे स्टिंग, सौरऊर्जेचा पॅनेल, पाण्याची टाकी आदी ठेवण्यात येणार आहे. संग्रहालयात ठेवण्यात आलेल्या वस्तूंची माहिती तसेच कार्य नागरिकांना मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध होणार आहे. रेनवॉटर हार्वेस्टिंग, सौरऊर्जेवर आधारित दुहेरी नळ पाणीपुरवठा आदी भूजल विभाग राबविण्यात असलेल्या योजनांचे प्रात्यक्षिक नागरिकांना दाखविण्यात येणार आहे. भूजल भवनाच्या अंतर्गत असलेले संग्रहालयही डिजिटल स्वरूपात नव्याने लोकांसमोर येणार आहे. संग्रहालयात विविध योजनांच्या प्रतिकृतीही तयार करण्यात आल्या आहेत. विंधन विहिरीद्वारे, भूपृष्ठावरील पाण्याद्वारे, विहिरीद्वारे, पाझर तलावात खोदलेल्या विहिरीद्वारे कृत्रिम भूजल पुनर्भरणाची माहिती घेता येणार आहे. याखेरीज, विंधनविहीर घेतेवेळी वापरण्यात येणारी उपकरणे, पाणी काढण्यासाठी आवश्यक साहित्य, विंधन विहीर घेतेवेळी आढळून येणारे दगड आदी पाहता येणार आहे. याखेरीज, जलभंजन, बंधारे, शिवकालीन पाणी साठवण योजना, सौरऊर्जे वरील आधारित दुहेरी पंप नळ पाणीपुरवठा योजना, जॅकेट वेल, वेल रिचार्ज आदींच्या प्रतिकृतींसह आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

भूजल भवनाला भेट देणाऱ्या नागरिकांना भूगर्भातील पाण्याचा प्रवासही अनुभवता येणार आहे. यासाठी भविष्यात आवारात एक विहीर खोदण्यात येणार आहे. त्याला पायऱ्या तयार करून नागरिकांना विहीरमध्ये उतरता येईल, अशी रचना करण्यात येईल. याद्वारे नागरिकांना झऱ्याचे पाणी कशाप्रकारे विहिरीत जमा होते, विहिरीतून आडवे बोअरवेल टाकून पाणी कसे वाढविता येते, जमिनीच्या खाली दगडाचे कोणते प्रकार आढळून येतात, कोणत्या दगडामध्ये पाणी झिरपते अथवा वाहते यासह पाणी येताना दगडाच्या फटी कशा असतात हे सर्व पाहता येणार असल्याची माहिती विभागाचे संचालक शेखर गायकवाड यांनी दिली.

लोकमत

शासनाची नवी मार्गदर्शक तत्त्वे : पाणी फाउंडेशनप्रमाणे क्षेत्रीय उपचार पद्धतीवर जोर

## जलयुक्त शिवारची कामे आता केवळ तंत्राच्या निकषावरच

राकेश कदम ।
लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : जलतज्ज्ञांची टीका आणि न्यायालयाचे झटके सहन केल्यानंतर शासनाने जलयुक्त शिवार योजनेला तंत्रशुध्द कामांची जोड दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून गावागावांमध्ये होणारी कामे ही राजकीय, प्रशासकीय वशिलेबाजीऐवजी अभिनेता आमीर खान यांच्या पाणी फाउंडेशनने केलेल्या तांत्रिक पध्दतीसारखीच होतील. यातही ठेकेदारांमार्फत होणाऱ्या कामांऐवजी लोकसहभागातून क्षेत्रीय उपचार पध्दतींवर जोर देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनही याच पध्दतीने प्रस्ताव मागवून घेत आहे.

जलयुक्त शिवार ही राज्य सरकारची आणि विशेषत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्वाकांक्षी योजना आहे. योजनेचे हे तिसरे वर्ष असले तरी पहिली दोन वर्षे या योजनेला प्रचंड टीका सहन करावी लागली. ही योजना म्हणजे ठेकेदारीला प्राधान्य देणारी असून तिला शास्त्रीय आधार नाही. यात राजकीय हस्तक्षेपाला वाव आहे, अशी टीका औरंगाबादचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. एच. एम. देसरडा यांनी केली होती. यासंदर्भात त्यांनी उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली. न्यायालयाच्या आदेशानंतर सरकारने एक समिती नेमून स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. परंतु या समितीने गोलमाल उत्तर देऊन सरकारचे पितळ उघडे पाडले. त्यामुळे आता तांत्रिक पध्दतीवर जोर आहे.

प्रत्येक गावचा सॅटेलाईट नकाशा

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २०१७-१८ करिता वापरण्यात येणारा कृती आराखडा नकाशा हा रिमोट सेन्सिंग अँड जीआयएस या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेला आहे. या नकाशामध्ये नागपूर येथील महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र तसेच पुणे येथील भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी विकसित केलेल्या आधुनिक तांत्रिक माहितीचा समावेश असून वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांच्यामार्फत हे नकाशे तयार करण्यात आलेले आहेत. या नकाशानुसार कामे करताना राजकीय नेते, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मर्जीऐवजी जमिनीचा उतार, मृदेची धूप, समपातळी-समुच्चता दर्शक रेषा, भूपृष्ठ रचना यांचा विचार करावा लागेल.

### नकाशे गावोगावी पाठवले

- जलयुक्त शिवार योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव पाठविणाऱ्या गावांना वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेने तयार केलेले नकाशे पाठवण्यात आले आहेत. कृषी सहायक, ग्रामसेवक, तलाठी, प्रगतिशील शेतकरी, सरपंच आणि गावातील पुढाऱ्यांनी या नकाशांचा अभ्यास करायचा आणि त्यानंतरच प्रस्ताव पाठवायचे आहेत. तसेच पूर्वी गाव आराखडा तयार केला जायचा, मात्र आता कृषी अधीक्षक कार्यालयाने शेजारच्या गावातील पाणलोट क्षेत्राचा विचार करून पाणलोट विकास आराखडा तयार करण्यास सांगितले आहे.



जलयुक्त शिवार

### बंधारे कमीच करा

- या अभियानातून कंपार्टमेंट बंडिंग, सलग समपातळी चर (हे.), माती नाला बांध, अनघड दगडाचे बांध अशा प्रकारची २५ कामे केली जातात. काही ठिकाणी ठेकेदारीमुळे आडवे, तिडवे बंधारे बांधण्यावर जोर देण्यात आला. आता मात्र ३० टक्केच कामे बंधाऱ्यांची आणि उर्वरित ७० टक्के कामे ही लोकसहभाग वाढून क्षेत्रीय उपचार पध्दतीने करावी लागतील.

Solapur Main
Page No. 2 Oct 05, 2017
Powered by: erelego.com

लोकमत

राज्यातील एकमेव महापालिका : भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचा पुढाकार

## 'रिचार्ज शाफ्ट'द्वारे भूजल पुनर्भरण

लोकमत न्यूज नेटवर्क



अकोला : अपुऱ्या पावसामुळे अकोला शहरावर जलसंकट कोसळले असून, शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पातील मृत जलसाठा उचलण्याची वेळ आली आहे. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, पावसाच्या पाण्याचे 'रिचार्ज शाफ्ट'द्वारे पुनर्भरण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून, शहरातील विविध भागांमध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविला जात आहे. विशेष म्हणजे, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ग्रामीण भागात हा उपक्रम राबविते; मात्र राज्यात प्रथमच शहरी भागामध्ये अकोला महापालिका क्षेत्रात हा उपक्रम सुरु आहे.

राज्य शासनाने पाणी टंचाई निवारणार्थ अकोला शहराकरिता नवीन विंधन विहिरीकरिता निधी मंजूर केला आहे, याकरिता सर्वेक्षण करीत असताना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने अतिशय कमी कालावधीत सर्वेक्षण तर केलेच; पण पुनर्भरणासाठी रिचार्ज शाफ्ट (पुनर्भरण स्तंभ) व जलभंजन करण्याचे महानगरपालिकेला सुचविले. महापौर विजय अग्रवाल व आयुक्त जितेंद्र वाघ यांना ही संकल्पना आवडल्याने त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळेच भूजल विकास यंत्रणेचे संचालक शेखर गायकवाड व उपसंचालक डॉ. प्रवीण कथने यांच्या मार्गदर्शनात सहा. भूवैज्ञानिक प्रवीण बर्डे यांनी शहराची पाहणी करून महानगरपालिका क्षेत्रात ५० जलभंजन व ४०० रिचार्ज शाफ्टसाठी जागा निश्चित केल्या. या कामास महापालिकेने तत्काळ निधी उपलब्ध करून दिल्यामुळे कामाला सुरुवात झाली आहे. शहरातील रामदासपेठ उमरी, न्यू तापडिया नगर, मनकर्णा प्लॉट, देशमुख फैल, मोहता मिल परिसर, सिंधी कॅम्प, जठारपेठ येथे रिचार्ज शाफ्ट तयार करण्यात आले आहेत, असे ४०० रिचार्ज शाफ्ट तयार केले जाणार आहेत.

"अकोला शहराचा भूभाग बेसाल्ट खडकाने व्यापल्याने नैसर्गिक पुनर्भरण अल्प प्रमाणात होते. त्यामुळे कमी पर्जन्य झाल्यास टंचाई निर्माण होते. यासाठी रिचार्ज शाफ्ट हे महत्त्वाचे ठरणार आहेत.
- डॉ. प्रवीण कथने, उपसंचालक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

### सिटी कोतवाली परिसरात घेतली चाचणी!

सिटी कोतवालीच्या मागील बाजूस रिचार्ज शाफ्ट तयार केले असून, त्याच्या भूस्तराची क्षमता चाचणी घेण्यात आली असता रिचार्ज शाफ्टने ५००० लीटर पाणी 30 मिनिटांत शोषून घेतले. त्यावेळी महापौर विजय अग्रवाल, आयुक्त जितेंद्र वाघ तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक रवींद्र शेलार, सहा. भूवैज्ञानिक प्रवीण बर्डे उपस्थित होते.

### काय आहे रिचार्ज शाफ्ट!

अकोला शहरात कमी पर्जन्य झाल्यास टंचाई निर्माण होते. त्यामुळे शाळांची पटांगणे, खुली मैदाने, शहरातील खोलगट भाग जिथे पावसाचे पाणी जमा होते त्या ठिकाणी पुनर्भरण स्तंभ (रिचार्ज शाफ्ट) द्वारे वाहून जाणारे पाणी १00 फूट खोलीवर नेऊन मुरविले जाईल. रिचार्ज शाफ्टद्वारे जलद गतीने पावसाचे पाणी २00 फुटावर २-३ जलधारक खडकाच्या विविध स्तरात मुरविल्या जाते. मुरलेले पाणी जलधारक खडकाद्वारे सर्वत्र जोडल्या जावून हातपंप व वीजपंपांना मुबलकपणे उपलब्ध होऊ शकेल. १00 मीटर मैदानात वार्षिक पर्जन्य ८00 मिमी गृहित धरल्यास ८000 घन मीटर म्हणजेच ८0,00,000 लिटर पाणी मुरविण्याकरिता उपलब्ध असेल.

Hello Akola
Page No. 4 Jun 08, 2018
Powered by: erelego.com

भूजल पातळीत वाढ करण्याचा प्रयत्न : राज्य शासनाच्या सूचना

## जलयुक्त शिवार शास्त्रशुद्ध पद्धतीने

लोकमत न्यूज नेटवर्क

1 जीएसडीएने खडकाच्या माहितीसह सुमारे दीड हजार पाणलोट क्षेत्रांचे नकाशे तयार केले आहेत. ज्या खडकांमध्ये पाणी मुरते अशाच परिसरात जलयुक्त शिवारची कामे करणे आवश्यक आहे.

2 राज्यातील धरण व तलावातील पाण्यावर १८ टक्के शेती अवलंबून असून ८२ टक्के शेती भूजलावर आधारित आहे. त्यामुळे भूजलपातळीवाढीवर काम करण्याची आवश्यकता आहे, असेही गायकवाड यांनी सांगितले.



पुणे : राज्य शासनाच्या 'जलयुक्त शिवार' या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून भूजलपातळीत वाढ करण्याचा प्रयत्न सुरु आहे. मात्र, त्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीचा अवलंब केला जात नसल्याचे समोर आले. त्यामुळे यापुढील काळात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाच्या सूचनेनुसार ही योजना अधिक चांगल्या रीतीने कार्यान्वित केली जाणार आहे.

दुष्काळग्रस्त परिस्थितीवर मात करण्यासाठी भूजलपातळीत वाढ होणे गरजेचे आहे. राज्य शासनातर्फे 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना सुरु करण्यात आली; मात्र त्याअंतर्गत कोणत्याही ठिकाणी कामे केली जात असल्याचे समोर आले. त्याचप्रमाणे जलयुक्त शिवारच्या कामांबाबत न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती. जल व मृदा संधारण हा गावाचा नाही, तर पाणलोट क्षेत्राचा विषय आहे. त्यामुळे जलयुक्त शिवार योजनेची कामे गावाची हद्द नाही, तर पाणलोट क्षेत्र विचारात घेऊन करणे आवश्यक आहे. यासाठी जमिनीखालील खडकाची माहिती असणे आवश्यक आहे.

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाचे (जीएसडीए) संचालक शेखर गायकवाड म्हणाले, "जलसंधारणाची कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. बेसाल्ट खडकावर पाणी ओतले, तर जमिनीच्या खाली जात नाही. त्यामुळे खडकांची रचना पाहून भूजलपातळी वाढण्यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे. जमिनीखालील खडक फोडून ६० ते ७० फूट नाला खोलीकरणाचे काम करणे योग्य नाही. त्यातच जलसंधारणाची कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने करावीत, याबाबतच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत."

## नदी, नाल्यांचे अडीच मीटरपेक्षा अधिक खोलीकरण नको

### शेखर गायकवाड : शिरपूर पॅटर्न तांत्रिकदृष्ट्या अयोग्य

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. ६ : खडकांची पाणी साठवण क्षमता आणि महाराष्ट्रातील खडकांचा अभ्यास केला असता जलसंधारणाच्या कोणत्याही कामासाठी दोन मीटरपेक्षा अधिक खोलीकरण अयोग्य आहे. नदी, नाले, ओढ्यांचे पुनर्जीवन करताना दोन मीटरपेक्षा अधिक खोलीकरण

शेखर गायकवाड

**प्रत्येक गावाचा होणार भूजल नकाशा**

**महाराष्ट्रातील प्रत्येक गावात किती भूजल साठा आहे, या भूजल साठ्यानुसार त्या गावात कोणकोणती पिके घेता येतील, पाण्याचे व पिकांचे नियोजन कसे असेल, याबाबतची माहिती मोबाईलच्या माध्यमातून ग्रामस्थांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. महाराष्ट्रातील आठ हजार गावांमध्ये ऑक्टोबरपासून हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाची पहिली कार्यशाळा सोलापुरात होणार असून या कार्यशाळेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींना भूजलाबाबत माहिती दिली जाणार असल्याचेही संचालक गायकवाड यांनी सांगितले.**

त्यांचे स्वागत केले. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून राबविण्यात

पद्धत तांत्रिकदृष्ट्या चुकीची व अयोग्य असल्याची माहितीही संचालक

### मिरजहून रेल्वेने देशभरात पाणीपुरवठा शक्य

गायकवाड : लातूरला रेल्वेने केलेला पाणीपुरवठा ऐतिहासिकच

सोलापूर, ता. ६ : भारतात यापूर्वी राजस्थानमध्ये सर्वप्रथम रेल्वेने पाणीपुरवठा करण्यात आला होता. ते अंतर १३० किलोमीटरचे होते. आणि आठवड्यातून तीनवेळा हा पाणीपुरवठा होत होता. गतवर्षीच्या दुष्काळात मिरजहून लातूरला ४५० किलोमीटर अंतरावरून पाणीपुरवठा करण्यात आला. या पाणीपुरवठ्यासाठी केलेली यंत्रणा आजही तत्पर आहे. देशातील कोणत्याही भागात पाणीटंचाई भासली तर मिरजहून रेल्वेने सहज

**सांगलीकरांचा दिलदारपणा....**

एकीकडे मिरजहून रेल्वेने लातूरला पाणीपुरवठा होत असताना दुसरीकडे सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ योजनेसाठी तेथील शेतकऱ्यांनी आठ कोटी रुपये भरून पाणी विकत घेतले होते. मिरजहून लातूरला झालेल्या पाणीपुरवठ्याबद्दल अनेक चांगल्या प्रतिक्रिया आल्या. मिरजमधील एका मुस्लिम व्यक्तीच्या मुलीच्या विवाहाची बोलणी लातूरमधील एका मुलासोबत सुरू होती. मिरजच्या व्यक्तीची आर्थिक स्थिती बिकट असल्याने लातूरवाल्यांनी होकार दिला नव्हता. मिरजवाल्यांनी लातूरला फुकट पाणी दिल्याने मिरजकरांचा दिलदारपणा पाहून लातूरच्या त्या व्यक्तीने मिरजचे स्थळ कबूल केल्याची घटनाही या रेल्वेने पाणीपुरवठा केल्यामुळे घडल्याचे श्री. गायकवाड म्हणाले.

# प्रदर्शन कक्ष विस्तारीकरण ...












# ज्ञानकेंद्र...

ज्ञान केंद्र हे एक असे खुले व्यासपीठ आहे की, प्रत्येकाला त्याच्या छंदांपासून ते आरोग्य, व्यक्तिमत्व विकास, आर्थिक नियोजन, सामाजिक अश विविध विषयांवर उपस्थितांस ज्ञान मिळते.

यामध्ये सहभागी अधिकारी, कर्मचारी अथवा इतर सर्व निमंत्रित वक्ते आपल्या स्लाईड शो, पत्रके अथवा भाषणाद्वारे सादरीकरण करतात.

याविषयी कार्यालयाने विस्तृत माहितीची “ज्ञानकेंद - एक आगळावेगळा उपक्रम, वर्ष २०१७-१८” नावानी एक स्वतंत्र पुस्तिका प्रकाशित केली आहे.

*उद्घाटन दिन क्षणचित्रे...*







श्री. व्ही. पी. जानराव, प्रशासन अधिकारी
०२ .०९.२०१७



श्री. एन. व्ही.शर्मा, वरिष्ठ भूभौतिक तज्ञ
०२ .०९.२०१७



श्री. शेखर गायकवाड, भाप्रसे, संचालक
०२ .०९.२०१७




श्री. सी. पी. भोयर, वरिष्ठ भूवैज्ञानिक
२३ मार्च २०१८



श्री. आर. बी. आरेकर, वरिष्ठ खोदन अभियंता
डिसेंबर २०१७



श्री. एस. व्ही. देशपांडे, माजी सह-संचालक (अभियांत्रिकी)
श्री अमित देव, व्यवस्थापक, ग्रुंडफोज कंपनी, पुणे
जानेवारी २०१८



श्री. सागर पिंगळे, विकास अधिकारी
श्री. गणेश बोराडे, क्षेत्र अधिकारी
भारतीय पोस्ट (फेब्रुवारी २०१८)



महिला दिनविशेष- महिला सक्षमीकरणाबाबत सुसंवाद
श्रीमती. राजे स्वाती, भाषा फौंडेशन प्रमुख, पुणे
०८ मार्च २०१८



श्री. संजय जगताप, प्रुडेंट कॉर्पोरेट, पुणे
फेब्रुवारी२०१८



श्री. एम. एस. देशपांडे, उपसंचालक,
भूसविय, पुणे (२३ मार्च २०१८)



श्री. युवराज आनंदराव जाधव, कनिष्ठ भूवैज्ञानिक,
भूसविय, पुणे ( एप्रिल २०१८)



श्री. बुधाजीराव मुळीक, कृषीतज्ञ
एप्रिल २०१८




श्री. एस. पी बागडे, माजी संचालक,
भूसविय, पुणे (एप्रिल २०१८)



श्रीमती अनुजा घाडगे, सेल्स ऍन्ड ट्रेनर्स मॅनेजर,
डीएसपी ब्लॅक रॉक इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स (एप्रिल २०१८)




श्री. चेतन निकम, अवर सचिव, पापुस्ववि,
मंत्रालय, मुंबई (जून २०१८)




श्री. संजीव वानखेडे, सहसंचालक, अभियांत्रिकी
भूसविय, पुणे (जून २०१८)



श्री. अशोक देशमाने,
स्नेहवन संस्था, पुणे (जून २०१८)



श्री. शेखर गायकवाड, भाप्रसे, संचालक
०२ .०९.२०१७

# प्रजासत्ताक दिन व चित्ररथ

## २६ जाने २०१८

नरिमन पॉइंट, मुंबई येथे प्रजासत्तक दिननिमित्त सौर उर्जा आधारित दुहेरी पंपा- जिवंत देखावा या चित्ररथाचे संचालन झाले.










# वृक्षारोपण
















# जनतेशी संपर्क (प्रदर्शन हॉल व सहभाग घेतलेल्या प्रदर्शनांचे फोटो)

भूजल यंत्रणेचा युनिसेफ प्रकल्पतील सहभागाची क्षणचित्रे





भू.स.वि.यं. ची भूजल स्त्रोत दिनाचे कार्यक्रमात उपस्थिती





------ब्रिजस्टोन टीमचे भू.स.वि.यं. येथे सादरीकरण व क्षेत्रभेट------









भू.स.वि.यं. चे महाराष्ट्र भूजल कायदा 2009 बाबत सादरीकरण





भू.स.वि.यं. चा यात्रपमणे अनेक व्यावसायिक प्रदर्शनांमध्ये उस्फूर्त सहभाग




भू.स.वि.यं. UNICEF, WSSD, Bidgestone च्या Media Launch कार्यक्रमात



"वनराई" चे वर्शापन दिनानिमित्त प्रदर्शनत सहभाग












# मा. संचालकांचा इस्त्रायल अभ्यास दौरा

**दिनांक 10 जून ते 14 जून 2018**







- मेकोरोट कंपनी मार्फत ग्राहकांना (शहर/नगर/गांव/ औद्योगिक/ कृषी ) ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करण्यात येतो.
- १००० लि. ला सुमारे १३६ रुपये दर
- पिण्याच्या पाण्याचे दर संपूर्ण देशात एकच ठरविण्यात आला आहे.
- महाराष्ट्रातील वीज वापरासंबधीचे टेलिस्कोपीक दर प्रणाली ही इस्त्रायलमध्ये पाणी वापरासाठी राबविण्यात येते.
- इस्त्रायलमधील पाण्यासंबंधीचे परिवर्तन-प्रादेशिक ते राष्ट्रीय
- याराकोन ते निगेव्ह वॉटर ग्रीड ओरियंटल पाईपलाईन १९५२
- याराकोन ते निगेव्ह वॉटर ग्रीड ऑक्सिडंटल पाईप लाईन १९६१
- राष्ट्रीय वॉटर कॅरियर १९६४
- नेगव ते शाफदान - वॉटर कॅरियर १९८१
- नि:क्षारीकरण केलेल्या पाण्यासाठी न्यूवॉटर कॅरियर १९८१
















# ४७ वा वर्धापन दिन...

## प्रस्तावना

सन २०१८ मध्ये या कार्यालयास ४८ वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने वर्धापनदिन कार्यक्रमान्वये दि. १३ व १४ जुलै रोजी विविध स्पर्धांचे आयोजन करणेत आले. त्याचप्रमणे वर्धापनदिनाचे दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांचे करण्यात आले. पाणी वापराचे जागृतीविषयक पोस्टर बनविणे, रांगोळी, फन गेम्स, कॅरम, संगीत खुर्ची, बुद्धीबळ, क्रिकेट अशा अनेक मजेदार खेळांनी कार्यक्रमाला निराळीच रंगत आली.

कार्यक्रमाचे निमित्ताने  सर्व कार्यलयीन कर्मचा-यांनी सजावट, स्नेहभोजन व प्रमाणपत्रे-बक्षिसे यांचे वाटप इत्यादींचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ अधिका-यांचे मार्गदर्शन, त्यांचा प्रत्यक्ष सहभाग आणि कर्मचा-यांचा उत्साह हे कार्यक्रमाचे आकर्षण आहे. कर्मचा-यांनी कार्यालयाची स्वच्छता, सजावट, विविध गाणी व नाटीकांची तयारी जोमाने केली आहे.



# वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांची काही क्षणचित्रे .....
















# कार्यालयाचे नविन संकल्प...

- कार्यालयाच्या कामाची जनमानसात प्रसिद्धी करणे व त्याकरीता वेबसाईट अद्ययावतीकरणासोबतच कार्यालयची व भूजलाची माहिती शाळा, वाड्या, वस्त्या, विविध संस्थांपर्यंत पोहचविणेचे कार्य करणे.
- सौरउर्जा आधारित २०११ नळ पाणी पुरवठा योजनांचा आराखडा मंजूर करून अंमलबजावणी सूरू करणे.
- भूजल दिन साजरा करणे.
- “भूजल भवन” मधील प्रदर्शन व इमरतीचे परीसरातील खुली प्रदर्शनी विकसित करून सर्वसामान्य जनता व शालेय विद्यार्थी यांना पाहण्यासाठी खुले करणे.
- भूजल, त्याचा वापर, जतन, संवर्धन इत्यादी व इतर माहितीचा प्रसार करणे.
- सौर उर्जेवरील पाणी पुरवठा योजनांचा प्रसार व विस्तारीकरण करणे.
- जुनी निर्लेखित वाहने, यंत्रसामुग्री व इतर साहित्य यांची इ-लिलाव पद्धतीने विल्हेवाट लावणे.
- अधिकरी व कर्मचा-यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
- भूजलाशी संबंधित नवीन प्रकल्प आखणे.
- जलयुक्त शिवार योजनेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेणे.
- राज्यस्तरीय प्रशस्त व सुसज्ज प्रयोगशाळेच्या इमारतीचे बांधकाम मौजे वडगांव बुद्रुक, पुणे येथे चालू करणे.
- जिल्हा व तालुकस्तरीय प्रयोगशाळांच्या इमारतींचे विस्तारीकरण व बांधकाम करणे.
- संचालकांसाठी निवासस्थानाची इमारत बांधणे.
- कार्यालयाचे स्वतःचे प्रशिक्षण केंद्र व निवास स्थानासाठी इमारत बांधकामाची मंजूरी करीता प्रयत्न करणे.